# सत्याचे प्रयोग आत्मचरित्र आणि गांधींना झालेली स्वः जाणिव

**संजय जनार्धन आगलावे**
*सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग*
*जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर, जि. अमरावती*

महात्मागांधी यांचा प्रभाव भारतातील प्रत्येक घटकावर पडलेला आहे. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा जवळपास सर्वच घटकांवर त्यांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष प्रभाव आपल्याला जाणवतो. विवीध ज्ञान शाखा असो वा संस्था या सर्वांना गांधीजीच्या जीवन आणि चरित्राचा अभ्यास निश्चितच केला पाहिजे. जगभरातल्या प्रभावशाली व्यक्तीमध्ये गांधीजीचा समावेश आहे. महात्मा गांधी या प्रभावशाली व्यक्तीमत्वाची जडण घडण कशी झाली याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी लिहीलेले आत्मचरित्र हे महत्वाचे साधन आहे. किंबहूना महापूरूषाच्या आत्मचरित्रातून त्यांच्या विचारांची आणि व्यक्तीमत्वाची जडण घडण कशी झाली हे जाणून घेता येते. माझे सत्याचे प्रयोग हे त्यांचे वैशिष्ठ पुर्ण आत्मचरित्र आहे. जगभरातील विविध भाषांमध्ये त्यांच्या अनुवाद झाले आहे. या पुस्तकाच्या मनोगतामध्ये म. गांधी म्हणतात, आत्मकथेच्या नावाखाली सत्याचे जे विविध प्रयोग त्यांनी केले ते त्यांना येथे सांगायचे आहे. हे प्रयोग त्यांच्या जीवनाचाच एक भाग असल्यामुळे ती त्याच्या जीवन वृत्ताप्रमाणे आहे, असे ते स्वतः कबुल करतात. राजकीय, आध्यात्मिक अशा प्रकारचे तसेच आहार विषयक प्रयोग त्यांच्या आत्मचरित्रातून येतांना दिसतात. त्यांचे हे प्रयोग स्वतः पुरते मर्यादीत नव्हते. प्रांजळपणे प्रत्येक गोष्ट सांगणे हे या आत्मचरित्राचे वैशिष्ठ आहे. जे जसे घडले तसे तसे सांगत जाणे कुठलाही अभिनिवेश त्या मध्ये आढळत नाही. त्यांचे प्रयोग परिपुर्ण आहे असा कुठलाही दुराग्रह नाही. सर्व प्रयोग विचारपूर्वक व व्यवस्थीत केलेले असले तरी त्यामधुन निघणारी तत्वे, निष्कर्ष अंतिम आहे, असा कुठलाही दावा ते करीत नाही. विनंम्रतेने ते सांगतात, ते त्यांच्या दृष्टीने ती त्यांना खरी वाटतात. असे असेल तरच त्यांच्या आधारावर पुढे जाता येईल. हे आत्मचरित्र १६ खंडामध्ये विभागल्या गेले आहे.

बालपण आणि युवा अवस्था, लंडन मध्ये विद्यार्थी म्हणून, बॅरीस्टर म्हणून भारतात, दक्षिण अफ्रिकेत, हिंदभेट, दक्षिण आफ्रिकेत परत, स्वदेशी, दक्षिण आफ्रिकेत परत, स्वदेशी, दक्षिण आफ्रिकेत, विलायत आणि युद्ध, स्वदेशी परत आणि साबरमती आश्रमाची स्थापना, चंपारण्य, अहमदाबादचे मजुर, खेडा सत्याग्रह, रिक्रूट भरती, रौलॅट ॲक्ट आणि राजकारणात प्रवेश, खादीचा जन्म. बालपण आणि युवावस्था या प्रकरणात वडिलांबद्दल सांगतांना ते म्हणतात, त्यांचे वडील कुटूंब प्रेमी, सत्यप्रिय, धिट उदारपण पण रागीट होते. पण त्यांनी पैसा जमा करून ठेवण्याचा लोभ केला नाही. फार थोडी संपत्ती त्यांनी त्यांच्या मुलांच्या वाट्याला ठेवली होती. म. गांधीच्या निर्लोभी व्यक्तीमत्वाच्या जडण घडणाची बिजे येथेच असावी असे वाटते. वडिलांप्रमाणेच आईचे संस्कार महत्वाचे असतात. त्यांची आई अत्यंत भाविक, पुजापाठ करणारी आणि सात्वीक विचारांची आदर्श स्त्री होती. गांधीजीच्या मनावर तीच्या एकंदर व्यक्तीमत्वाचा सखोल परिणाम दिसून येतो. म. गांधीचे जीवनात सुद्धा धार्मिकतेला महत्व आहे. पण कर्मकांडाला त्यांनी फारसे महत्व दिले नाही. व्यवहार कुशलता हा त्यांच्या आईचा गुण, त्यांच्या मध्ये दिसतो. आश्रम चालवतांना किंवा इतर ठिकाणी नियोजनबद्धता आणि काटकसर या गुणांचे संस्कार त्यांच्या घरातील एकंदरीत वातावरणातून मिळालेले दिसते. काटकसर जरी ते करत असले तरी त्यांचे रुपांतर कधी लोभामध्ये त्यांनी होवू दिले नाही, हे फार महत्वाचे आहे. हायस्कूल मध्ये असतांना ते सर्वसाधारण विद्यार्थी होते. ते प्रकाशझोतात कधी येत नसत, शिक्षकांनी कधी फसवण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही. त्यांना मित्र नव्हते, अत्यंत भिडस्त अशा त्यांचा स्वभाव होता. दुसऱ्या मुलाचे बघून लिहीण्याचा विचारही त्यांच्या मनात आला नाही. शाळा तपासणीच्या वेळी त्यांना त्यामुळे शिक्षकाच्या रोषाला समोर जावे लागले. पण त्यांनी शिक्षकाविषयी विनयवृत्ती कधीच ढळू दिली नाही. वडिल मंडळीचे दोष न बघण्याचा त्यांचा स्वभाव होता. सौजन्य आणि विनयशिलता हा त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव होता. हरिश्चंद्राचे नाटक बघून आपण सुद्धा तसे व्हावे असे त्यांना वाटे. शिक्षण आणि आई वडिलांची मर्जी राखण्याचा प्रयत्न होता. स्वतःच्या अनुभवातून त्यांना शिक्षणक्रमामध्ये मातृभाषेखेरीज राष्ट्रभाषा इतर देशी भाषांना स्थान मिळाले पाहिजे असे त्यांना वाटते. त्यांचा बाल विवाह झाला होता. त्या विवाहाचे समर्थन करता येत नाही असे त्यांना वाटते. आपल्या पत्नीने आपल्या मर्जीने वागले पाहिजे असे त्यांना वाटे. या प्रयत्नातून त्यांच्यात बेबनाव होत होता. म. गांधी हे नेहमी आत्मचिंतन करीत असत. त्यामुळे तिच्यावर आपण बंधणे घालणार असू तर तीनेही आपल्यावर बंधणे का घालू नये या आत्मचिंतनातुन स्त्री-पूरूष दोघांनाही समान संधी मिळाली पाहिजे हा विचार पुढे आला. पुढे वेगवेगळ्या चळवळीमध्ये, सत्याग्रहामध्ये, वेगवेगळ्या सामाजिक, आर्थिक

स्तरातील स्त्रीया त्यांच्या सोबत सक्रीय सहभाग घेतांना दिसतात.

मित्राच्या संगतीने आणि आग्रहाने त्यांनी मांसाहार केला, त्यावेळी राजकोट मध्ये सुधारणापंथ अस्तित्वात होता पुष्कळ लोक मांसाहार करीत आहे अशी माहिती त्यांना मिळाली. मित्राने त्यांना मांसाहाराचे फायदे सांगितले. त्यांनी मांसाहार करायला सुरूवात केली. पण त्यासाठी त्यांना घरी खोटे बोलावे लागे असले असत्य तेही आई जवळ बोलणे, आपल्या आई वडिलांना कळले तर त्यांना किती वेदना होईल माता पित्यांना फसविणे आणि खोटे बोलणे हे मांस खाण्यापेक्षाही निश्चित वाईट यांची त्यांना जाणिव झाली. सत्यवचन हे कसे महत्वाचे आहे याची जाणिव होत होती. आणि सत्याचा मार्ग त्यांनी अवलंबीणे सुरू केले. मित्राच्या संगतीने त्यांच्यावर वाईट परिणाम झाले. ते जसे प्रेमळ तसेच संशयी होते. मित्राच्या संगतीने आपण आपल्या पत्नीला दुखः दिले याची त्यांना खंत वाटू लागली. ही एक प्रकारची हिंसाच आहे, हा विचार त्यांच्या मनात येवून यामधून त्यांना अहिंसेचे महत्व पटले. त्यातील बारकावे त्यांच्या लक्षात यायला लागले. अहिंसा ही किती व्यापक संकल्पना आहे यांची व्याप्ती किती मोठी आहे, हा विचार त्यांना आत्मचिंतनातून गवसला. एकदा त्यांचा मांसाहार त्यांच्या मांसाहारी बंधुच्या सोन्याच्या कड्याचा तुकडा कर्ज फेडण्यासाठी विकला. ही एक प्रकारची चोरीच होती. त्यामुळे आत्महत्येचे विचार त्यांचा मनात येवू लागले. त्यांच्या वडिलांनी आज पर्यंत कुठल्याही भावंडांना मारले नव्हते परंतू या चुकीचे प्रचंड ओझे त्यांना वाटत होते. शेवटी सर्व गुन्हे कबुल करण्याचा त्यांनी निश्चय केला. चिठ्ठी वाचून वडिलांच्या डोळ्यात अश्रु गळायला लागले त्यांच्या प्रेमरूपी अश्रुंनी त्यांच्या मनावरचे सारे दडपण दुर झाले. त्यांच्या दृष्टीने हा अहिंसेचा महत्वाचा धडा होता. अहिंसेच्या शक्तीची यथार्थ जाणिव या प्रसंगातून झाली. जो मनुष्य आपल्या अधिकारी व्यक्तीजवळ आपली चुक कबुल करतो, ते सर्वात उत्तम प्रायचित्य आहे असे त्यांना वाटते. लंडन मध्ये शिक्षण घेत असतांना त्यांच्या खाण्यापिण्याची पंचायत होत होती. कारण तेथे सर्वत्र मांसाहार केल्या जात होता, त्यांचे मित्र सुद्धा त्यासाठी आग्रही होते. पण त्यांनी आईला मांसाहार न करण्याचे वचन दिले होते. तेथे त्यांना शाकाहारी भोजनगृह मिळाले तेथे त्यांना तेथे स्वाल्टचे अन्नहाराचे समर्थन हे पुस्तक त्यांना वाचायला मिळाले. पुस्तक वाचल्यावर त्यांनी बुद्धीपुर्वक त्यांनी शाकाहाराची निवड केली. गांधीजी आणि त्यांचे मित्र त्यांचे मांसाहारावरून बरेचदा मतभेद होत होते. पण त्यामुळे त्यांचे संबंध कधी तुटले नाही, किंवा कधी भांडण झाले नाही. या मुळाशी मित्रप्रेम हा अतुट धागा होता. वेगवेगळे विचार आचार असतील तरी त्याबद्दल आदर बाळगला पाहिजे हा विचार प्राधान्याने होता.

विलायतेत असतांना तेथील सभ्यपणाची लक्षणे संपादन करायची प्रबळ ईच्छा त्यांना झाली. तेथील पोषाख त्यांनी भरपूर पैसे खर्च करून त्यांनी शिवून घेतला. केश रचना करतांना त्यांची तारांबळ उडायची. नृत्य शिकण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. पण हे करत असतांना आपण विद्यार्थी आहोत, आपण शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे हे त्यांच्या लक्षात आले. आपल्या चांगल्या वर्तनुकीवरून आपल्याला सभ्य म्हटले तरी ठिकच आहे, नाही तर अशा गोष्टीत पडायचे नाही. हे त्यांनी स्वतः पुरते ठरवले पोशाखापेक्षा वर्तणूक, सदाचार महत्वाचे आहे. ही बिजे मनावर रूजायला लागली आणि पुढे भारतातील दारिद्र बघुन त्यांनी केवळ पंचाच घालण्याचा निर्णय घेतला. लहान लहान प्रसंगातून म. गांधी कसे घडत गेले हे आपल्या लक्षात येते. या आत्मचरित्रात तत्वज्ञान फारसे सांगितलेले नाही. यात विविध प्रसंग येतात ते पण तुटक स्वरूपात. पण वाचक एकदा हे आत्मचरित्र वाचायला घेतो. ते पूर्ण वाचून झाल्याशिवाय खाली ठेवत नाही. वाचकाच्या मनात हळूहळू ते घर करायला लागले, हे निश्चीत एका महात्म्याच्या आचाराची विचाराची जडणघडण वाचकांना प्रभावीत करणारी आहे. सदैव दुसऱ्यांच्या व स्वतःच्या कुटूंबाच्या अडचणीची त्यांना जाणिव होती. बॅरीस्टरच्या परीक्षेची तयारी करती असतांना सदैव साधेपणाने राहण्याचा त्यांचा प्रयत्न होता. इंग्लंड मध्ये राहत असतांना आपल्या कुटूंबाच्या गरिबीला साजेसे आपले जीवन साधे नाही, आपल्या भावांच्या त्यागाचा आणि अडचणीचा विचार त्यांना अस्वस्थ करीत होता. त्यांच्या पेक्षा साधेपणाने राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा ते विचार करायला लागले. त्यातील अत्यंत गरीब विद्यार्थी कंगाल अवस्थेत आठवड्याचे दोन सिलींग देवून एका खोलीत राहत होता. आपण सुद्धा काटकासर करून जीवन जगू शकतो. साध्या राहणीमानाचा विचार त्यांच्या मनात सुरू झाला. त्यामध्ये पुस्तक देखील त्यांच्या वाचनात आले, स्वयंपाक देखिल त्यांनी हाताने करायला सुरूवात केली. या साधे पणाच्या व स्वावलंबनाच्या प्रयोगामुळे त्यांना आत्मीक साधनेची जाणिव व्हायला लागली. भौतिक सुखातून मिळणारे समाधान हे क्षणिक असते. साधी राहणी आणि उच्च विचार हा गांधी विचाराचा एक मुख्य भाग आहे, हे वेगळे सांगायला नको. त्यांची पायाभरणी या सत्याच्या प्रयोगातून झाली असे म्हणता येईल. गांधींचा स्वभाव लाजाळू होता, त्यामुळे अनेकदा त्यांना अडचणीचा सामना करावा लागला, पण फजीती होण्या पलिकडे आपले फारसे नुकसान झाले नाही असे म्हणतात. या स्वभावामुळे उलट पक्षी त्यांचा फायदाच झाला. स्वतःच्या

विचारावर ताबा ठेवण्याची त्यांना सवय लागली. सत्याची आराधना करायची असेल तर मौनाचे साधन गरजेचे ठरते. म्हणून आत्मचरित्रात म्हटले आहे, सत्याच्या पुजाऱ्याने मौन धारण करणे इष्ट आहे, जाणता अजानताही मनुष्य अनेक वेळा अतिशयोक्ती करीत असतो. किंवा जे सांगण्यासारखे असेल ते लपवित असतो किंवा बदलवून सांगत असतो. ज्याला थोडेच बोलाचे असते तो विचार केल्याशिवाय बोलणार नाही. स्वतःचा प्रत्येक शब्द तोलून बोलेल, संकोच वृत्ताला ते स्वतःची ढाल समजतात. तीच्यामुळे मला परिपक्व होण्याची संधी मिळाली असे ते मानतात. विलायतेत ते जवळपास वर्षभर राहील्यावर काही धर्मग्रंथ त्यांनी वाचले. भगवद् गीता हा अमुल्य ग्रंथ आहे ही त्यांची समजुत होती. तत्वज्ञानातील श्रेष्ठ ग्रंथ म्हणून त्याकडे ते बघतात. त्यासोबत त्यांनी आर्नल्डचे बुद्ध चरित्र दि लाईट ऑफ ऐशिया हे पुस्तक सुद्धा वाचले. यापुस्तकाच्या वाचनाने त्यांना आनंद झाला. नव्या कराराच्या वाचनाने सुद्धा त्यांच्या मनावर इस्ट परिणाम झाला. सर्व धर्मग्रंथ वाचले पाहिजे आणि ज्ञान मिळविले पाहिजे विचार त्यांच्या मनात दृढ झाला.

भारतात परतल्यावर त्यांच्या जातीतील एका पक्षाने त्यांना वाळीत टाकले. पण त्यांनी कोणाबद्दल राग मनात ठेवला नाही. त्यांच्याशी तिरस्काराने वागणाऱ्यासोबत ते नम्र पणे वागत असे. बहिष्काराच्या ठरावाचा विरोधात जायचा त्यांनी प्रयत्न केला नाही. त्यांचे जवळच्या नातेवाईक त्यांना लपून छपून खायला द्यायला तयार होते. पण जी गोष्ट उघडपणे करता येत नाही ती लपून करणे त्यांना मान्य नव्हते. किंबहूना वाळीत टाकल्यावर जातीत प्रवेश मिळण्याचा प्रयत्न सुद्धा त्यांनी केला नाही. त्यांच्या प्रतिकार न करण्याचा भूमिकेतून त्यांना आदर मिळत गेला. आणि त्यांचा हा सत्याचा प्रयोग यशस्वी ठरला. काठेवाडला असतांना तेथील लडपटींचा वशिलेबाजीचा स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी चाललेली धडपड शिरस्तेदारांना द्यावी लागणारी लाच हलक्या कानाचे दुसऱ्यावर अवलंबून असलेले संस्थानिक हे सर्वच वातावरण त्यांना असह्य व्हायला लागले. त्यामुळे वकीली न करता कुठलीतरी नोकरी करावी हा विचार त्यांच्या मनात यायला लागला. या दरम्यान त्यांना दक्षिण आफ्रिकेत जायची संधि मिळाली आणि ते आफ्रिकेत गेले. आफ्रिकेत भारतीय लोकांना फारसा मान नव्हता, ज्यांच्या कामासाठी ते आफ्रिकेत आले होते त्या अब्दुल्ला शेठ त्यांच्याशी वागतांना तेथील लोक तुच्छतेने वागत. अब्दुल्लाच्या ते अंगवळणी पडले होते. पण गांधींना बोचत होते.

अब्दुल्ला शेठजींच्या कामासाठी त्यांना प्रिटोरीयाला जावे लागले. डरबनहून या कामासाठी ते रवाना झाले. मॅरीत्सबर्ग येथे गाडी पोहोचल्यावर त्यांना पहिल्या वर्गाच्या डब्यात बघितल्यावर त्यांना शेवटच्या वर्गातील डब्यात जायला सांगतली. पहिल्या वर्गाचे टिकीट असून सुद्धा त्यांना स्टेशनवर उतरवून देण्यात आले. या अपमानामुळे आपण आपल्या हक्कासाठी झगडले पाहिजे आपल्याला सहन करावे लागले हे दुखः वरवरचे आहे. वर्णद्वेश हा महारोगासारखा आहे. तो दुरू करण्यासाठी पाहिजे तो संघर्ष करण्याची मनाची तयारी केली पाहिजे हा विचार पक्का झाला. सत्याचे प्रयोग या आत्मचरित्रातून एका सर्वसामान्य कुटूंबप्रिय माणसापासून देशासाठी आणि मानवतेसाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या महात्म्याची जडण घडण कशी होत जाते त्याचा प्रवास अनेक लोकांना प्रेरणा देणारा आहे. सत्याचे प्रयोग नैराश्याने ग्रासलेल्या माणसासाठी प्रेरणास्त्रोत आहे यात शंका नाही.

**संदर्भ -**

*सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा (संक्षिप्त) - मो.क. गांधी नवजीवन प्रकाशन मंदीर अहमदाबाद सातवी आवृत्ती*